आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, ८ फेब्रुवारी २०२२ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : १४ । पाने : ४ । मूल्य २ ₹




# मोंढ्यातील 'पावसाळी वातावरण' दूर करा

## आमदार प्रकाश सोळंकेंच्या प्रशासनाला सूचना

प्रतिनिधी



माजलगाव : मतदारसंघात तब्बल ३०० गावे आहेत, दोन नगर परिषदा आणि एक नगरपंचायत आहे. त्यामुळे सर्व मतदारसंघातील सर्व प्रश्नांकडे गांभीर्याने पाहीले जात. माजलगावातील जुना मोंढा भागातील साचलेल्या पाणीप्रश्नी उपाययोजना करण्याची गरज आहे, याबाबत सूचनाही नगरपालिका प्रशासनाला दिल्या आहेत, अशी माहिती 'वर्तमान'शी बोलताना आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली.

जुना मोंढ्यातील साचलेल्या पाणीप्रश्नी आमदार प्रकाश सोळंके यांनी प्रशासनाला याबाबत तातडीने लक्ष द्या, अशा सूचना केल्या आहेत. मतदारसंघातील ३०० गावांकडे आपले लक्ष असते. तेथील समस्यांवर ठोस उपाययोजना करणे गरजेचे असते. माजलगावतील जुना मोंढा परिसरात साचलेल्या पाण्याप्रश्नी व्यापाऱ्यांनी तक्रार केली आहे. त्यानुसार हे काम नगरपालिका प्रशासनाचे आहे. व्यापाऱ्यांच्या या प्रश्नी नगरपालिका प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करा, अशी सूचना केली असल्याचे आमदार प्रकाश सोळंके म्हणाले.

माजलगाव शहरातील मोंढ्याच्या प्रवेशद्वारावर गुडघाभर पाणी साचल्याने व्यापारी, ग्राहक, नागरिकांना ये-जा करणे जिकरीचे झाले असून याकडे नगरपालिकेचे गत दोन वर्षापासून दुर्लक्ष होत असल्याने नागरिक मेटाकुटीला आले आहेत. शहरातील मोंढ्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर दोन वर्षापासून नियमितपणे नळाच्या पाण्याचे लिकेज व नालीचे पाणी रोडवर येत आहे. या पाण्यामुळे व्यापारी वर्गाचे मोठे नुकसान होत आहे. या पाण्यामुळे अनेक व्यापारी आपली दुकाने इतरत्र स्थलांतरित करत आहेत.

काही व्यापाऱ्यांनी सतत पाणी साचत असल्याने दुकाने बंद केली आहेत. पाणी साचल्याने या भागात कसलेच ग्राहक येत नाहीत. यामुळे मोंढ्यातील व्यापारी पाण्यामुळे संतप्त झाले आहेत. व्यापाऱ्यांनी या पाण्यामुळे अनेक आंदोलने केली. अक्षरशः पाण्यात बसून आंदोलने केली, कित्येक वेळेस मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवकांना भेटले. मात्र प्रश्न मार्गी लागला नाही. दरम्यान, आमदार प्रकाश सोळंके यांनी याप्रश्नी लक्ष घातल्याने हा प्रश्न सुटेल, असा आशावाद व्यापारी आणि नागरिक यांनी व्यक्त केला आहे.

### व्यापाऱ्यांचा मोंढा बंदचा इशारा

या पाण्याच्या लिकेजमुळे अनेक आंदोलने केली. लोकप्रतिनिधीना भेटलो, प्रशासनाने आम्हाला लेखी देऊन हा प्रश्न जर मार्गी लागत नसेल तर आम्ही सर्व व्यापारी मोंढा मार्केट बंद ठेवण्याचा निर्णय घेऊ, असा अनेक व्यापाऱ्यांनी इशारा दिला आहे.



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# आडसकरांचा माजलगावात मुक्काम वाढला

## मोहन जगताप यांचा सल्ला भलताच घेतला मनावर

विशेष प्रतिनिधी



माजलगाव : भारतीय जनता पार्टीचे नेते रमेश आडसकर यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघात जनसंपर्क मोठ्या प्रमाणात वाढविला असून गेल्या काही दिवसांपासून त्यांचा माजलगाव मुक्कामही वाढला आहे. दरम्यान, एका कार्यक्रमात भाजपा नेते तथा छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप यांनी रमेश आडसकर यांना उद्देशून माजलगावात २४ तास उपलब्ध असले पाहिजेत, असा उपरोधात्मक सल्ला दिला होता. मोहन जगताप यांनी दिलेला सल्ला आडसकरांनी भलताच मनावर घेतला असल्याचे बोलले जात आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीत रमेश आडसकर यांनी भाजपाकडून विधानसभा निवडणूक लढविली होती. माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मातब्बर असलेल्या प्रकाश सोळंके यांच्याशी निवडणुकीत कडवी झुंज देवून नवखे असताना सुध्दा रमेश आडसकर यांनी चांगला प्रभाव दाखविला. त्यामुळे आडसकर समर्थकांमध्ये नवचैतन्य आहे. एकीकडे माजी आमदार आर.टी.देशमुख यांनी मतदारसंघात संपर्क वाढविला असून मोहन जगतापही भाजपचे सक्रिय कार्य करीत आहेत.

तर नितीन नाईकनवरे हेही आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सक्रिय झालेले आहेत. अशा पार्श्वभूमीवर रमेश आडसकर यांनीही आपला आवाज व्यापक जनसंपर्क वाढविला आहे. समता कॉलणी परिसरात स्वतंत्र सदनिका घेवून आपले वास्तव्य सुरू केले आहे.

मागील काही दिवसांमध्ये एका कार्यक्रमात आमदार प्रकाश सोळंके, रमेश आडसकर, बाबुराव पोटभरे, राजेसाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत राजकीय कलगीतुरा रंगला. यात मोहन जगताप यांनी आडसकरांना माजलगावात मुक्कामी रहायला हवे तर पक्ष संघटन वाढेल, असा सल्ला दिला. हा सल्ला आडसकरांनी भलताच मनावर घेतल्याचे दिसून येते. जगताप यांनी दिलेल्या सल्लानंतर आडसकरांना मुक्काम वाढला आहे हे अधोरेखित होते. भाजपातील एका कार्यकर्त्याला या बाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, माजलगाव मतदारसंघात रमेश आडसकर यांचा संपर्क सुरूवातीपासूनच आहे. त्यांच्या कार्यशैलीमुळे कार्यकर्त्यामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. कार्यकर्त्याच्या अडीअडचणी समजून घेवून व्यापक संघटन वाढविण्याचे काम रमेश आडसकर करत आहेत, असेही कार्यकर्त्याचे म्हणणे आहे.



## फास्टट्रॅकन्यूज

### ऊसतोडणीसाठी शेतकऱ्यांची कारखान्यांकडे याचना

बीड : जिल्ह्यासह महाराष्ट्रात यंदा अतिरिक्त ऊसाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. काही शेतकऱ्यांच्या ऊसाने तुरा टाकला तरी त्या ऊसाची तोड झालेली नाही. आपला ऊस घेवून जा अशी विनवणी अनेक शेतकरी कारखानदारांकडे करत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या तीन वर्षापासून बीड जिल्ह्यामध्ये चांगला पाऊस पडत असल्याने ऊसाचे क्षेत्र वाढले. जवळपास ६० हजार क्षेत्रात ऊसाची लागवड आहे. वाढत्या ऊसाच्या क्षेत्रामुळे गाळपाचा प्रश्न निर्माण झाला. अनेक शेतकऱ्यांच्या ऊसाने तुरा टाकला असून त्यांच्या ऊसाला अद्याप तोड आलेली नाही. आमचा ऊस घेवून जा अशी म्हणण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे.

## चंद्रकांत शेजुळ यांचे अभिष्टचिंतन!



माजलगाव : तुळजाभवानी अर्बनचे सर्वेसर्वा, बीड जिल्हा परिषदेचे सदस्य तथा वर्तमान माध्यम समुहाचे सल्लागार चंद्रकांत शेजुळ यांचा वाढदिवस चाहत्यांच्या साक्षीने साजरा झाला. वर्तमान टीमच्या वतीनेही यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संपादक बाबा श्रीहरी देशमाने, संपादक भगीरथ तोडकरी, पत्रकार सुनिल चौरे, महेश बोटवे, अतुल चांदमारे.




# ऊसतोड महामंडळाच्या विविध योजनांना मान्यता

## विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे यांचे निर्देश

प्रतिनिधी



मुंबई :ऊसतोड कामगारांसाठी आरोग्य, सामाजिक न्याय विभाग,महिला व बालविकास विभाग,कामगार विभाग तसेच सामाजिक संस्था काम करत आहेत.स्थानिक पातळीवर या विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची जनजागृती करून राज्यातील ऊस तोड कामगारांची सामाजिक न्याय विभागाने नोंदणी प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे यांनी दिले.

दूरदृश्यप्रणालीव्दारे ऊसतोड कामगारांचे विविध प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी यापूर्वी घेतलेल्या बैठकीतील निर्देशांबाबत केलेल्या अंमलबजावणी बाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी या बैठकीला सामाजिक न्याय विभागाच्या अपर मुख्य सचिव जयश्री मुखर्जी, सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे,साखर आयुक्त शेखर गायकवाड, सहकार आयुक्त अनिल कवडे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसचिव विजय लहाने,कामगार विकास उपआयुक्त सुनिता म्हैसेकर, महिला व बालविकास विभागाचे उपायुक्त राहुल मोरे, महिला बालविकास विभागाचे उपसचिव ठाकूर,सामाजिक संस्थाच्या मकाम बीडच्या मनिषा टोकले व पल्लवी हर्षे,समता प्रतिष्ठानच्या शुभांगी कुलकर्णी, महिला आरोग्य परिषद च्या काजल जैन, ऐकल महिला संघटनाचे राम शेळके, साथी चे अभिजित मोरे व अरुण गद्रे, मासुमच्या निलंगी सरदेशपांडे, आरोग्य अभियानाचे अभय शुक्ला, बहुउद्देशीय सामाजिक संस्थाचे श्रीधर आडे, नाशिकचे सिव्हिल सर्जन डॉ.अशोक थोरात यावेळी उपस्थित होते.

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे यावेळी (पान ३ वर)

### येत्या १५ फेब्रुवारीला महत्वपूर्ण बैठक

साखर आयुक्त शेखर गायकवाड म्हणाले, ऊसतोड कामगारांच्या प्रश्नाबाबत सहकार आयुक्त व आम्ही संयुक्तपणे काम करत आहोत. सामाजिक न्याय विभागाकडूनही चर्चा करत आहोत. तसेच साखर कारखान्यांसोबत बैठक घेवून ऊसतोड कामगारांसाठी कोणकोणत्या सुविधा देता येत आहेत याची पूर्वप्राथमिक माहिती या बैठकीत दिली. तसेच उपसभापती आगामी १५ फेब्रुवारी रोजी याबाबत सविस्तरपणे महत्वपूर्ण बैठकीत सादरीकरण करू असे सांगितले. महिला व बालविकास विभाग उपायुक्त राहुल मोरे, जिल्हा आरोग्य विभाग बीड, कामगार विभाग यांनीही त्यांच्या विभागाकडून ऊसतोड कामगारांसाठी सुरू असलेल्या कामांची माहिती यावेळी दिली. यावेळी ऊसतोड कामगारांसाठी कार्यरत असलेल्या विविध सामाजिक संस्थांनी ऊस तोड कामगारांचे प्रश्न व शासनाने करावयाची कार्यवाही यासंदर्भात सविस्तर मुद्देही मांडले.

## संपादकीय

# सबका साथ, सबका विकास

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेले बजेट नेहमीप्रमाणे सत्ताधीशांचे समाधान करणारे तर विरोधकांना निराश करणारे म्हटले तर वावगे ठरणार नाही. १९४७ मध्ये स्वतंत्र भारताचा पहिला अर्थसंकल्प मांडला गेला. २०१९मध्ये बजेट मांडणाऱ्या निर्मला सीतारमन पहिल्या महिला अर्थमंत्री ठरल्या. त्यानंतर सलग चौथ्यांदा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या त्या पहिल्या महिला अर्थमंत्री आहेत. सर्वसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासह सबका साथ, सबका विकास या मूलमंत्रावर आधारित या अर्थसंकल्पात सर्वांचा विचार केला आहे. डिजिटलायझेशन हाच भविष्यात प्रगतीचा आधार आहे. यावेळच्या बजेटचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण भारत डिजिटल करण्यादृष्टीने मोदी सरकारने भरीव तरतूद केली आहे. देशाचा पहिला कागदविरहीत डिजिटल अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थ आणि कंपनी व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, कोरोनाविरुद्ध भारताचा लढा २०२१मध्येही सुरूच आहे आणि कोविडनंतरच्या काळात जगभरात राजकीय, आर्थिक आणि धोरणात्मक संबंध बदलत असताना इतिहासातील हा काळ नव्या युगाची पहाट आहे आणि त्यात भारत खरोखरच आशावादा आणि आश्वासनपूर्तीचा देश बनण्यासाठी सुसज्ज आहे. सीतारामन यांच्या या वक्तव्याचा सर्वकष बजेटमध्ये पाहायला मिळतो. डिजिटलायझेशन' अंतर्गत यावेळी शेतकरी आणि विद्यार्थ्यांना अग्रक्रम देण्यात आला आहे. शाळांमध्ये प्रत्येक वर्गात टीव्ही बसवला जाणार आहे. देशात डिजीटल विद्यापीठ स्थापन केली जाणार आहेत. शेतकऱ्यांना डिजिटल बनवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. देशात डिजीटल विद्यापीठ स्थापन केली जाणार आहेत. शेतकऱ्यांना डिजिटल आणि हायटेक सेवा देण्यासह कृषी क्षेत्रात खासगी क्षेत्राची गुंतवणूक वाढवण्यासाठी पीपीपी मॉडेलवर काम केले जाणार आहे. केवळ डिजिटलायझेशन' भर न देता देशभरात रसायनमुक्त नैसर्गिक शेतीला चालना दिली जाईल. पहिल्या टप्प्यात गंगा नदीच्या ५ किमी रुंद कॉरिडॉरमध्ये शेतकऱ्यांच्या जमिनीवर लक्ष केंद्रीत करण्यात येईल, असेही अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे. एमएसपीद्वारे २.३७ कोटी रुपये दिले जाणार आहेत. खाद्य तेल आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने मोठी घोषणा केली आहे. देशात तेल बियांच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. येत्या वर्षभरात खासगी नेटवर्क प्रोव्हायडरच्या सहकार्याने फाइव्ह जी सेवा सुरू केली जाईल. तसेच भारतनेट' द्वारे गाव इंटरनेटनं जोडली जाणार आहेत. नवे चलन म्हणून २०२२-२३ डिजिटल रुपयाची घोषणा करण्यात आली आहे. तसेच ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा वापर प्राधान्याने केला आहे. स्वत:चे घर हे प्रत्येकाचे स्वप्न असते. मात्र, सर्वसामान्यांना हे शक्य नसते. मोदी सरकार केंद्रात आल्यावर त्यांनी पीएम आवास योजना' प्रभावीपणे राबवली आहे. देशातील सर्व लोकांना घरं देण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री आवास योजना ६६९ जिल्ह्यांमध्ये सुरू आहे. या योजनेअंतर्गत सरकार बेघर लोकांना घरं देतं. या योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदानही दिलं जातं. पात्र शहरी गरीबांना घर खरेदी आणि बांधण्यासाठी गृहकर्जावर क्रेडिट लिंक्ड सबसिडी मिळते. यामुळे लाखो लोकांच्या स्वत:चे घराचे स्वप्न सत्यात साकारले गेले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पातही पीएम आवास योजने'वर अधिक भर देताना या योजनेअंतर्गत दोन वर्षात ८० लाख घरे बांधण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पीएम आवास योजने'साठी ४८ हजार कोटींची निधीची तरतूद केली आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ही ८० लाख घरं देशातील विविध राज्यांमध्ये शहरी आणि ग्रामीण भागात बांधली जाणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी याचा फायदा होईल. एखाद्या व्यक्तीने नुकतेच घर किंवा फ्लॅट घेतला असेल तर त्यालाही या योजनेचा लाभ मिळू शकतो. तुमच्या घरावर घेतलेल्या कर्जासाठी लागणाऱ्या व्याजावर सरकारकडून मिळणाऱ्या सबसिडीचा तुम्ही लाभ घेऊ शकता. यामुळे तुमच्या घराची किंमत कमी होईल, जे फायद्याचं आहे. पोस्ट सेवा कालबाह्य ठरण्याची ओरड सुरू असताना गावागावात सक्षमपणे कार्यरत असलेल्या पोस्ट ऑफिस सेवेला संजीवनी देण्याचे काम बजेटद्वारे करण्यात आले आहे. पोस्ट कार्यालयात आता एटीएम सुविधा दिली जाणार आहे. पायाभूत सुविधांनाही २०२२-२३ बजेटमध्ये प्राधान्य देण्यात आले आहे. २०२३ पर्यंत २५ हजार किलोमीटर लांबीचा महामार्ग बांधला जाणार आहे. येत्या तीन वर्षात वंदे भारत' योजनेअंतर्गत ४०० नव्या गाड्या सुरू केल्या जाणार आहेत. भांडवली गुंतवणुकीत ३५.४० टक्के वाढ करण्यात आली असून ७.५० लाख कोटी रुपये गुंतवले जाणार आहेत. विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) कायदा बदलला जाणार आहे. नव्या कायद्यात राज्यांचीही महत्त्वाची भूमिका असेल, असेही अर्थसंकल्पात नमूद आहे. केंद्र सरकारची आणखी एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजे जीएसटी'. जीएसटी' लागू केल्यापासून आतापर्यंत सर्वाधिक कर याच महिन्यात (जानेवारी २०२२) वसूल झाला आहे, असे सीतारामन यांनी यावेळचा अर्थसंकल्प सादर करताना आवर्जून सांगितले. देशभरात पेन्शनधारकांची संख्या मोठी आहे. या सर्वांना केंद्र सरकारने दिलासा दिला आहे. पेन्शनमधून मिळणारे उत्पन्न करमुक्त करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. यंदाच्या बजेटचे शेअर बाजारातही जंगी स्वागत झाले. नदी जोड प्रकल्पाद्वारे पाच नद्या जोडल्या जाणार आहेत. नारीशक्तीला पाठबळ मिळण्यासाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाला बूस्टर डोस देण्यात आला असून इमर्जन्सी क्रेडिट लाइन गॅरंटी स्कीमनुसार, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना १३० लाखाहून अधिक कर्ज देण्यात आले आहे. त्यामुळे गुंतवणूक आणि रोजगार क्षेत्राला बळकटी मिळाली आहे.

# केडर रूल्सचे नवे धोरण संघर्षाचे मूळ?

**केडर रूल्समधे केंद्र सरकारने केलेल्या बदलांमुळे सध्या राज्य विरुद्ध केंद्र असा संघर्ष निर्माण होण्याच्या शक्यता वर्तवल्या जात आहेत. यामधे प्रतिनियुक्तीचा मुद्दा अधिक चर्चेत आहे. कोण चूक आणि कोण बरोबर यापेक्षा जनता आणि आपली संघराज्यीय रचना यांचा विचार करून केंद्र आणि राज्यांनी एकत्र हे पेल्यातलं वादळ शमवावं.**

आज-काल

**महेश झगडे**

कोणत्याही लोकशाही पद्धतीमधे लोकप्रतिनिधी हे राज्य घटनेनुसार तयार केलेलं शासन चालवायचं काम करत असतात. पण राज्यकारभाराचा गाडा चालवण्यासाठी मजबूत प्रशासकीय व्यवस्था गरजेची असते. भारतीय संविधान तयार होत असताना घटना समितीमधे यावर बरीच चर्चा झाली. भारताने संघराज्य पद्धती स्वीकारल्यामुळे ते संघराज्यीय स्वरूप टिकून राहण्यासाठी तशी वरिष्ठ प्रशासकीय व्यवस्था असावी, असा विचार पुढे आला.

प्रशासकीय व्यवस्थेचं नियोजन

घटना समितीच्या चर्चामंथनातून भारतीय लोकसेवा ज्यात आयएएस, आयपीएस अशा पदांचा समावेश असणारी व्यवस्था आकाराला आली. यासाठी संविधानात प्रकरण १४चा समावेश केला गेला. यानुसार ही व्यवस्था संपूर्ण देशासाठी काम करणारी असावी. देशाची एकात्मता, एकत्रीकरण आणि अखंडता कायम राहील यासाठी त्याचं एकरूप स्वरूप तयार व्हावं. तिसरं म्हणजे ही व्यवस्था स्वतंत्र असावी. राजकीय लोकप्रतिनिधी शासन चालवत असल्याने प्रशासकीय व्यवस्थेनं त्यांचं ऐकायला हवं. पण अनाठायी बाबी ऐकू नयेत. कोणत्याही चुकीच्या दबावाला बळी पडता कामा नये. या तिन्ही गोष्टींसाठी प्रकरण १४मधे तरतुदीही करण्यात आल्या. तसंच प्रशासनाच्या या नियुक्त्यांमधे कुठेही राजकीय हस्तक्षेप होणार नाही, अशीही तरतूद केली गेली. यासाठी स्वतंत्र असलेल्या लोकसेवा आयोगाकडून निःपक्षपातीपणे या प्रशासकीय नियुक्त्या केल्या जातील असं ठरवलं गेलं.संविधानाला आणि जनतेला बांधील असणारी निकोप प्रशासकीय व्यवस्था कार्यरत व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश होता. ही व्यवस्था लोकप्रतिनिधींच्या अंतर्गत काम करणारी असली तरी लोकप्रतिनिधी चुकीचे पाऊल टाकत असतील, तर त्यांना ठामपणाने विरोध करण्याचं सामर्थ्यही तिच्यात असलं पाहिजे, असं अभिप्रेत आहे. यानुसार गेली सात दशके ही व्यवस्था सुरळीतपणाने काम करतेय.

केडर रुल्सनुसार नियुक्त्या

आयएएस, आयपीएस आणि आयएफएस या दुहेरी नियंत्रण असणाऱ्या व्यवस्था आहेत. कारण या पदांवर उमेदवारांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून म्हणजेच केंद्राकडून केली जाते. तसेच त्यांच्यासाठीचे सर्व नियम करण्याचे अधिकारही केंद्रालाच आहेत. पण त्यांचं प्रत्यक्ष नियंत्रण राज्यांना दिलेलं आहे. यासाठी प्रत्येक राज्यांचे केडर ठरवलेले आहेत. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आयएएस, आयपीएस यांची जी नियुक्ती होते, ती केंद्र शासनासाठी होत नाही, तर ती राज्य शासनांसाठी होते. यासाठीच्या उमेदवारांची परीक्षा होऊन प्रशिक्षण सुरू होते तेव्हाच राज्यांसाठी त्यांची विभागणी ठरवलेली असते. या अधिकाऱ्यांसाठी १९५४च्या केडर रूल्स'नुसार काही नियम ठरवले आहेत. प्रत्येक राज्याला किती संख्येने आयएएस आणि आयपीएस अधिकारी असावेत, हे या केडर रूल्सनुसार ठरवलं जातं. जसजसा काळ बदलत जातो, जसजशी गरज वाढते वा कमी होते तसतसे या संख्येमधे राज्यांच्या सल्लामसलतीने केंद्र शासन बदल करत जाते. राज्यांचा आकार छोटा असेल तर संख्या कमी होते. आकारमान वाढलं तर संख्या वाढते. गेली सात दशके अत्यंत सूत्रबद्धपणाने ही व्यवस्था सुरू आहे. काही वेळा तणावाचे प्रसंग निर्माण होतात. पण ते मोजके अपवाद वगळता अतिशय सुंदर पद्धतीनं या




व्यवस्थेचं कामकाज सुरू आहे. कोणत्याही पद्धतीत थोडेफार दोष असतात तसे यात असू शकतील पण ते दूर करणारी यंत्रणाही यात आहे. त्यामुळेच आजवर फार मोठा वाद किंवा संघर्ष यात निर्माण झाला नाही.

केडर रुल्सची भूमिका

केडर रूल्स बनवण्यामागं दोन महत्त्वाचे उद्देश होते. एक म्हणजे, आकारमानाने मोठ्या असलेल्या खंडप्राय देशात संघराज्य पद्धती अखंडित रहावी यासाठी वेगवेगळ्या राज्यांतले वेगवेगळे लोक वरिष्ठ प्रशासनात जातील आणि ते देश एकरूप करण्याचे काम करतील, असा विचार यामागे होता. सुदैवाने, गेल्या सात दशकांत ही कल्पना अत्यंत चांगल्या प्रकारे राबवली गेलीय. आसाममधला एखादा अधिकारी गोव्याला जातो, कर्नाटकातला एखादा अधिकारी बिहारला जातो, अशा माध्यमातून देश एकरूप राखण्यास हातभार लावला जातोय. दुसरी गोष्ट म्हणजे वरिष्ठ पातळीवरील प्रशासकीय अधिकारी परराज्यातील असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा दुजाभाव राहात नाही. याचा परिणाम सामाजिक पातळीवरही सकारात्मकरीत्या दिसून येतो.

भरती आणि नियुक्तीची प्रक्रिया

देशात एकूण ६३९६ आयएएस अधिकारी आणि ४८०२ आयपीएस अधिकारी असे मिळून ११११९८ अधिकारी कार्यरत असतात. पण सध्या या जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त राहात असल्याचं दिसून आलंय. आयएएस अधिकाऱ्यांमधे थेट भरती आणि पदोन्नती असे दोन भाग असतात. यातल्या थेट भरतीचा विचार केला तर देशात २०१३मधे १२२८, २०१४मधे १३६४, २०१५मधे ११६४, २०१६मधे १०७९, २०१७मधे ९८०, २०१८मधे ७८२, २०१९मधे ८९६ आणि २०२०मधे ७९६ पदे रिक्त होती. खरं तर ही रिक्त पदे वेळच्या वेळी भरली गेली पाहिजेत. या प्रशासकीय रचनेत एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, केंद्र सरकारला अधिकाऱ्यांसाठीचा विशिष्ट असा कोटा नाहीय. खरं तर प्रशासन दोन ठिकाणी चालतं. योजनांची अंमलबजावणी, दैनंदिन प्रशासन राज्यांमधे चालतं तर धोरणात्मक निर्णयांची आखणी करण्याचं काम केंद्रीय पातळीवर होतं. संविधानानुसार संघराज्य पद्धती असली तरी राज्ये स्वायत्त असावीत, त्यांना स्वयंनिर्णयाचा हक्क असावा, त्यांना कल्याणकारी राज्य करण्याचा हक्क असावा आणि यासाठी त्यांना प्रशासकीय व्यवस्था दिलेली आहे. तशाच प्रकारे केंद्राचे स्थानही महत्त्वाचं आहे. कारण केंद्र सगळ्या राज्यांना, नागरिकांना बांधून ठेवतं. संपूर्ण देशाचा विकास समान पद्धतीने होण्यासाठी तशा प्रकारची प्रशासकीय व्यवस्था केंद्राकडे असणं गरजेचं ठरतं. यासाठी परिपक्व विचारांचे, देशाला पुढे घेऊन जाणारे आयएएस अधिकारी केंद्राला गरजेचे असतात. पण केंद्राकडे तसा कोटा नाही. कारण शेवटी ही केंद्रीय सेवा नाहीय. ती राज्य केडर आहे. त्यामुळे राज्यांतून केंद्रात अधिकारी जातात.

केंद्राचा शब्द अंतिम

आयएएस झाल्यानंतर आधी राज्यांमधे नियुक्ती होते. तिथं अनुभव आल्यानंतर निकषांनुसार ते केंद्रामधे जातात. कारण देशपातळीवर काम करण्यासाठी अधिक प्रगल्भता गरजेची असते. राज्यांतून हे अधिकारी मिळवण्यासाठी काही नियम ठरवले गेलेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात जिल्हाधिकारी किंवा वरिष्ठ पातळीसाठी १९० जण असतील तर त्यातले ४० टक्के म्हणजेच ७६ उमेदवार हे केंद्रीय नियुक्तीसाठी राखीव ठेवण्यात आलेत. अशाच प्रकारे प्रत्येक राज्यांसाठी विशिष्ट टक्केवारी ठरवण्यात आलीय. केंद्रात डेप्युटी सेक्रेटरी, जॉईंट सेक्रेटरी, अॅडिशनल सेक्रेटरी, सेक्रेटरी आणि कॅबिनेट सेक्रेटरी या पदांवर जाण्यासाठी दोन गोष्टी असतात. एक म्हणजे यासाठी केंद्र सरकार राज्यातल्या अधिकाऱ्यांचे रेकॉर्ड तपासून त्यापैकी कार्यक्षम अधिकाऱ्यांची नावे सूचीबद्ध करते. हे उमेदवार अत्यंत तावून, सुलाखून घेतलेले असतात. यासाठी एक समिती नेमलेली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, तुमच्याकडचे कोणकोणते अधिकारी केंद्रात यायला इच्छुक आहेत, अशी विचारणा केंद्र सरकारकडून राज्यांना केली जाते. याला ऑफर लिस्ट म्हणतात. केंद्राच्या विचारणेनुसार राज्य सरकार अशा इच्छुकांची यादी मागवते आणि केंद्राला सादर करते. त्यावर विचारविनिमय करून त्यातल्या काही अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीचे आदेश दिले जातात. असे आदेश दिल्यानंतर राज्यांनी त्या अधिकाऱ्यांना राज्यांच्या सेवेतून मुक्त करायचं असतं. यात कधी काही वादाचा मुद्दा आलाच तर त्याबाबत केंद्राचा शब्द अंतिम मानला जातो.

केडर रुल्समधे वादग्रस्त सुधारणा

आता १९५४च्या आयएएस केडर्स रूल्स'मधे केंद्र सरकारने सुधारणा केल्या आहेत आणि त्यावरूनच राजकीय वातावरण तापताना दिसतंय. यातला प्रतिनियुक्तीचा नियम ६ जसाच्या तसाच ठेवलाय पण त्यात एक परिच्छेद वाढवला गेलाय. त्यानुसार राज्यांना ठरवून दिलेल्या कोट्यानुसार तेवढ्या संख्येने अधिकारी प्रतिनियुक्ती म्हणून केंद्राला द्यावेच लागतील. तसंच इतर एका नियमात बदल केलाय. त्यानुसार केंद्राने एखाद्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती केल्यावर त्या अधिकाऱ्याला केंद्राने ठरवून दिलेल्या तारखेला जॉईन व्हावंच लागणार आहे. ऑफर लिस्टमधे नाव नसतानाही एखाद्या अधिकाऱ्याला केंद्र सरकार त्यांच्याकडे प्रतिनियुक्त करून घेऊ शकेल. यासाठी राज्यांचं काहीही म्हणणं असलं, विरोध असला तरी केंद्र सरकार त्या अधिकाऱ्याला केंद्रीय प्रशासनात घेऊ शकेल, असाही बदल केला गेलाय. थोडक्यात, राज्यांकडे अधिकाऱ्यांना मुक्त करण्याचा जो अधिकार होता तो संपुष्टात आणला गेलाय. यामुळेच सध्या केंद्र विरुद्ध राज्य अशी संघर्षाची स्थिती उद्भवण्याची शक्यता आहे.

केंद्र-राज्य संघर्षाचा इतिहास

खरं तर, बरेच अधिकारी केंद्रात जायला इच्छुक असतातच. त्यामुळे आजवर कधी असा तणाव या पद्धतीत निर्माण झालेला नाही. एखाद्या वेळी गरज पडली तर आयआरएसमधल्या अधिकाऱ्यांना सामावून घेतलं जायचं. पण गेल्या ७-८ वर्षात केंद्राकडे जाण्याचा अधिकाऱ्यांचा ओढा कमी होत चाललाय. याबाबत ठोस आकडेवारी उपलब्ध नाहीय. पण एका पाहणीनुसार, २०१४ ते २०१९ या काळात प्रतिनियुक्ती होऊन केंद्रात जायचं प्रमाण ६९ टक्क्यांवरून ३० टक्क्यांपर्यंत घसरलंय. साहजिकच यामुळे केंद्र शासनाला प्रशासकीय व्यवस्थापनासाठी मनुष्यबळ अपुरं पडतंय. म्हणूनच केंद्राने या नियमांत बदल केलाय. यामागचं आणखी एक कारण म्हणजे पश्चिम बंगालचे मुख्य सचिव अलापन बंडोपाध्याय यांच्या प्रतिनियुक्तीचे आदेश केंद्राने देऊनही मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांना सेवेतून मुक्त केलं नाही. असाच प्रकार पश्चिम बंगालमधेच तीन आयपीएस अधिकाऱ्यांबाबतही घडला होता. असे प्रकार देशात आधीही घडलेत. २००१मधे केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांचं सरकार होतं आणि तामिळनाडूत जयललितांचं सरकार होतं. तेव्हा तिथल्या सीआयडीने करुणानिधींच्या डीएमके पक्षाच्या केंद्रात मंत्री असणाऱ्या नेत्यांविरोधात वॉरंट काढून पकडण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळीही तीन आयपीएस अधिकाऱ्यांना केंद्रात प्रतिनियुक्तीसाठी आदेश देण्यात आले होते. अशा प्रकारचे संघर्ष हे एखाद्या घटनेवरून निर्माण झालेले असतात. त्यावरून फार अवडंबर माजवण्याची गरज नाही.

जनतेचं हित महत्त्वाचं

मुख्य मुद्दा आहे तो जनतेचा. जनतेला निकोप प्रशासन हवंय. कसल्याही दबावाखाली आणि चुकीच्या पद्धतीने काम न करणारे अधिकारी हवेत. ९९ टक्के आयएएस अधिकारी निःपक्षपातीपणाने काम करतच असतात. त्याशिवाय या देशाचा गाडा इतकी वर्षे अखंडितपणाने चाललाच नसता. दुसरी गोष्ट म्हणजे राजकीय वादविवाद हे लोकशाहीत असणारच आहेत. त्याशिवाय लोकशाहीला अर्थच नाही. पण राजकीय संघर्षामधे प्रशासनाने संविधानाशी, जनतेशी असणारी बांधिलकी जपण्याला सर्वोच्च प्राधान्य देत निकोप काम केलं पाहिजे. आज ते सुरू आहेच, पण एखादा अधिकारी जर याच्याशी विसंगत वागत असेल तर त्याचे दुष्परिणाम व्यवस्थेला भोगावे लागू नये. शेवटी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, केंद्राला सशक्त करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची बाब आहे. पण त्याच वेळी आम्ही म्हणू तिथं, आम्ही सांगू त्यावेळी एखाद्या अधिकाऱ्यानं काम केलं पाहिजे अशी भूमिकाही केंद्राने घेता कामा नये. थोडक्यात, केंद्र आणि राज्य यांनी एकत्र सल्लामसलत करून हे पेल्यातलं वादळ शमवावं. कोण चूक आणि कोण बरोबर यापेक्षा जनता आणि आपली संघराज्यीय रचना यांचा विचार केंद्रस्थानी ठेवून पुढे जायला हवं.

# विषमतेचा चक्रव्यूह भेदणार कसे?

**भारतात १० टक्के लोकांकडे ५७ टक्के संपत्ती आहे आणि तळातल्या लोकांकडे फक्त १३ टक्के संपत्ती आहे. उपभोगासाठी लोकांच्या खिशात पैसाच नाही. त्यामुळे त्यांच्याकडून मागणी नाही. मागणी नसल्यामुळे गुंतवणूक नाही आणि परिणामी मंदीसदृश स्थिती निर्माण झालीय. बेरोजगारी, गरिबी, भाववाढ आणि विषमता असा हा समस्यांचा चक्रव्यूह आहे.**

अर्थकारण

**हेमंत देसाई**

या अब्जाधीशांची एकूण संपत्ती ७२० अब्ज डॉलर इतकी असून, भारतातल्या ४० टक्के गरिबांच्या एकूण संपत्तीपेक्षा हे प्रमाण जास्त आहे. भारताच्या तुलनेत सगळ्यात जास्त अब्जाधीश सध्या अमेरिका आणि चीनमधे आहेत. फ्रान्स, स्वीडन आणि स्वित्झर्लंड या प्रगत देशांपेक्षा भारतात अब्जाधीश जास्त आहेत. दुसरीकडे देशातल्या ५० टक्के गरीब नागरिकांचा राष्ट्रीय संपत्तीतला वाटा फक्त ६ टक्के आहे. यावरून भारतात आर्थिक असमानता दिसून येते. ऑक्सफॅमच्या अहवालानुसार, कोरोना काळात आफ्रिका खंडातल्या उपसहारा देशांमधे जेवढी गरिबीची वाढ झाली, तशीच भारतातही झालीय. २०२० साली भारतातल्या गरिबांची संख्या दुप्पट होऊन १३ कोटी ४० लाख झाली. रोजंदारीवर काम करणारे कर्मचारी, स्वयंरोजगार असलेले लोक आणि बेरोजगारांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या. ब्लूमबर्ग अब्जाधीश



निर्देशांकानुसार, जगातल्या ५०० सर्वात श्रीमंतांनी गेल्यावर्षी त्यांच्या संपत्तीत एक ट्रिलियनपेक्षा जास्त डॉलर्सची भर घातली. पण त्याचवेळी जगभरात गरीब अधिकच गरीब होत गेले. ही परिस्थिती पालटण्यासाठी सरकारने आरोग्य आणि शिक्षणात अधिक गुंतवणूक करावी आणि अतिश्रीमंतांवर एक टक्का अधिभार लावावा, अशी शिफारस या अहवालात केली आहे. गेल्या केंद्रीय अर्थसंकल्पापूर्वी भारतातल्या अनेक अर्थतज्ज्ञांनी अशीच शिफारस केली होती.

अब्जाधीशांच्या संपत्तीवर कर

भारतात १० टक्क्यांकडे ५७ टक्के संपत्ती एकवटली आहे आणि तळातल्या लोकांकडे फक्त १३ टक्के संपत्ती आहे. अर्थातच, इतकी टोकाची विषमता असलेल्या देशात सामाजिक असंतोष पसरण्याची शक्यता जास्त असते. शिवाय सरकारचा महसूल हा मोठ्या प्रमाणावर जीएसटीसारख्या अप्रत्यक्ष करावर अवलंबून आहे. अप्रत्यक्ष कराचा भार हा गरीब आणि श्रीमंतांवर सारखाच पडत असतो.

उलट प्रत्यक्ष कर हा जास्त न्याय्य असतो. म्हणूनच भारतातल्या शंभर अब्जाधीशांच्या संपत्तीवर चार टक्के कर लावला, तर त्यातून १७ वर्षांपर्यंत माध्यान्हभोजन योजना राबवता येऊ शकते. तर केवळ एक टक्का संपत्ती कर लावला, तर त्यातून शालेय शिक्षण आणि साक्षरता कार्यक्रम किंवा आयुष्मान भारताच्या योजनेवरचा खर्च सात वर्ष इतक्या काळासाठी करता येऊ शकतो.

निवडणुकांनंतर महागाईची संक्रांत

कोरोना संसर्गकाळात २०२० मधे स्त्रियांचं ५९ ट्रिलियन रुपयांचं उत्पन्न घटलं. तर एक कोटी तीस लाख महिलांचा नोकरीधंदा गेला. कोरोनामुळे बालमृत्यू, कुपोषण, भूकमुक्ती, स्त्री-पुरुष समानता, शिक्षण, रोजगार या सगळ्याच आघाड्यांवर जग मागे गेलं. संख्येचा विचार केला, तर जगातले सगळ्यात गरीब आणि कुपोषित लोक भारतातच राहतात.या काळात लोकांचा औषधोपचारावरचा खर्च वाढला आणि महागाई उच्चांकी स्तराला जाऊन पोचली. गेल्या दोन वर्षात भारतातली पाच कोटी कुटुंबे, म्हणजेच वीस कोटी लोकसंख्या गरिबीच्या दरीत लोटली गेलीय. शिवाय आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर सात वर्षातल्या उच्चांकी म्हणजे बॅरलला ८७ डॉलरवर जाऊन पोचलेत. दीड महिन्यात कच्च्या तेलाच्या दरात २६ टक्के वाढ झालीय. पाच राज्यांतल्या निवडणुका पार पडल्या की नंतर परत भारतातल्या पेट्रोल-डिझेलचे दर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाववाढीचा आणखी एकदा भडका उडण्याची शक्यता आहे.

(समाप्त)

# गुटखामाफियांच्या मुसक्या आवळल्या

## माजलगावात पाच जणांवर गुन्हा; २ लाख रूपयांचा गुटखा जप्त

प्रतिनिधी

माजलगाव : दोन युवक गुटखा घेऊन जात असल्याची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने माजलगाव शहरातील आझाद चौकातील बायपासवर सापळा रचून दोन कार अडवत कारच्या डिकीतून दोन लाख रूपयांच्या गुटख्याच्या ३२ गोण्या जप्त केल्या. ही कारवाई गुरूवारी सकाळी साडेआठ वाजता केली. याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल केला.

सहाय्यक पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांनी विशेष पथकाला गुरूवारी सकाळी ६ वाजता केजहून माजलगाव येथे पाठवले. या पथकातील पोलिसांनी शहरातील आझाद चौकातील बायपास रोडवर सापळा रचला. पहिली कार (एमएच २०, सी एच ३१९९) दुसरी कार (एमएच१४ एफ सी २९२३) या दोन्ही कार रोखून धरल्या. या वेळी दोन्ही कारमधून



पाच जण खाली उतरले. पहिल्या कारमधून दुसऱ्या कारमध्ये गुटखा टाकताना पोलिसांनी पकडला. या कारवाईच्या वेळी दोघे पळून जाण्याचा प्रयत्न करताना त्यांना सिनेस्टाइल पाठलाग करून पकडले.

या छाप्यात पोलिसांना राज निवास कंपनीच्या ३२ गोण्या सुगंधित मसाला गुटखा पोलिसांच्या हाती लागला असून याची किंमत १ लाख ५० हजार रूपये, तर जाफरानी जर्दा पुड्याची किंमत ४० हजार रुपये आहे. पोलिसांनी २ कारसह गुटखा असा९ लाख २२ हजारांचा माल जप्त केला. पोहे.कॉ.बालाजी दराडे यांच्या तक्रारीवरून त्रिंबक आनंत डुकरे, ज्ञानेश्वर बाबासाहेब होंडे, सचिन गोरख सुरवसे, बाबासाहेब सुभाष वरेकर, अशोक धोंडिराम यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# माजलगावात लतादीदींना व्यापाऱ्यांकडून आदरांजली

प्रतिनिधी

माजलगाव : दाही दिशा, अष्टोप्रहार, तीन्ही बाजूने पाण्याने वेढलेल्या जगाच्या पल्याड, सात सुरांच्याही पलीकडे नेणारा एक सूर म्हणजे भारतरत्न गानकोकिळा लतादीदी मंगेशकर (९२ वर्षे) जपून ठेवलेला हा सुर रविवारी सकाळी परमात्माने स्वतः कडे नेला. या निधनामुळे संपूर्ण भारतात नव्हे तर जगातील त्यांचा चाहता वर्ग दुःखी झाला. या मुळे माजलगाव तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सामुहिक श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता.



या प्रसंगी माजलगावचे आमदार तथा माजी राज्यमंत्री प्रकाश सोळंके, मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक, माजलगाव बाजार समितीचे उपसभापती अच्युतराव लाटे, भाजपचे सोशल सेलचे दत्ता महाजन, जेष्ठ साहित्यिक प्रभाकर साळेगावकर, माजलगाव संगीत शिक प्राणेश पोरे यांना श्रद्धांजली व्यक्त करताना अश्रू अनावर झाले. पत्रकार कमलेश जाब्रस व तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, यांनी श्रद्धांजलीपर शोक व्यक्त केले. व रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक वाडेकर यांनी केले, या कार्यक्रमात नगरसेवक विनायक रत्नपारखी, माजी नगरसेवक शरद भांडेकर, व्यापारी महासंघाचे महासचिव, सुनिल भांडेकर उपाध्यक्ष जफर मिर्झा, खत संघटनेचे नंदकुमार आनंदगावकर, किराणा व्यापारी धनराज बंब, संतोष अब्बड, संजय कोकड गणेश लोहिया, मोहन घुले, विवेक बजाज, सराफा असोशिएनचे अध्यक्ष रामराजे रांजवण, रमेश कासट, शेख सल्लाऊदिन, पत्रकार संतोष जेथलिया, पुरुषोत्तम करवा, राज गिलडा ट्रान्सपोर्ट संघटनेचे अध्यक्ष फिरोज इनामदार, मोहन त्रिमुखे, किराणा असोसिएशनचे सचिव कपिल पगारीया, संजय शिंदे, व्यापारी महासंघाचे सर्व पदाधिकारी, सर्व पोटसंघनाचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने सर्वच स्तरातून नागरिक व व्यापारी बंधू उपस्थित होते.




# पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांना सांगितीक मानवंदन

## पंडित पुष्पराज कोष्टी यांचा गौरव; अंबाजोगाईत रंगली मैफल

प्रतिनिधी

अंबाजोगाई : तपस्वी पखावजसाधक पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना सांगितीक मानवंदना देण्यात आली. यानिमित्त शहरातील मान्यवरांच्या उपस्थितीत पद्मश्री शंकरबापू सांगितीक गौरव पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रख्यात डागर घराण्याचे सुरबहार वादक पंडित पुष्पराज कोष्टी (मुंबई) यांना पद्मश्री शंकरबापू सांगितीक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी साहित्यिक जयप्रकाश दगडे, ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती, बंकटस्वामी मठ, पंढरपूर), काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, माजी आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.नंदकिशोर सोमवंशी, पंडित उध्दव आपेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराचे स्वरूप १५ हजार रूपये रोख रक्कम, मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. तसेच पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कुटुंबाच्या वतीने बंकटस्वामी संस्थान, आळंदी (पंढरपूर), नेकनूर यांना ५० हजार रूपये देणगीही देण्यात आली. सूरबहारचा स्वर आणि पखवाजचा धीरगंभीर नाद यातून उपस्थितांना नादब्रह्माची अनुभूती आली. याप्रसंगी वसंतराव मोरे, अविनाश मोरे, प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे, गायिका राणी वडगावकर, दगडू लोमटे, भगवानराव शिंदे, शरयु हेबाळकर, प्रा.शरद हेबाळकर, पांडुरंग देशपांडे, उल्हास पांडे, प्रकाश बोरगावकर, सुभाष शेप, विनोद निकम आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी पंडित पुष्पराज कोष्टी व त्यांचे सुपुत्र भूषण कोष्टी या पिता-पुत्रांची सुरबहार वादन संगीत सभा झाली. यावेळी पखवाज संगत पंडित उद्धवराव आपेगावकर यांनी केली. या संगीत सभेची सुरुवात राग पटदीपने झाली. 'पटदीप' हा संध्याकाळचा राग आहे. ध्यान धारणेच्या अंगाने जाणारा अभ्यासू राग आहे. आलाप, जोड आणि झाला या माध्यमातून बंदीश चौताल यामध्ये वाजविली. पंडित उध्दवबापू आपेगावकर यांनी पखवाजाची तोलामोलाची साथ संगत केली. कारण, रुद्रविणा, सुरबहारच्या साथीला फक्त पखवाज असते. यात पंडितजींनी तालाचा उपज अंगाने वादन केले आणि तितक्याच समर्थपणे सुरबहार व पखवाज यांच्या सुसंवादाने रसिकांना खिळवून ठेवले.

# लतादीदींच्या रूपाने स्वरसूर्य लोपला

## सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष प्रकाश दुगड यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

माजलगाव : भारताच्या गानकोकीळा भारतरत्न लता मंगेशकर यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी दुःखद निधन झाले. या निमित्ताने येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाच्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात श्रध्दांजली सभा आयोजित करण्यात आली. दरम्यान, संगीत क्षेत्रातील स्वरसूर्य लोपला आहे, अशी भावना प्रकाश दुगड यांनी व्यक्त केली आहे.

श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष प्रकाश दुगड यांनी भारतरत्न लता मंगेशकर यांचा आवाज गीतांच्या माध्यमातून सूर्य, चंद्र, तारे असेपर्यत टिकणारा आहे. लतादीदींच्या जाण्याने भारतीय संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. संपूर्ण भारत आणि जगभरात त्यांच्या आवाजाने लाखो रसिकांना मंत्रमुग्ध केले होते. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो अशी श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाच्या वतीने प्रार्थना केली. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष राधेश्याम लोहिया, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष प्रकाश दुगड, अभय कोकड, प्रेमकिशोर मानधने, तेजस महाजन, जगदीश साखरे, संस्थेचे सर्व सभासद तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक बाबुराव आडे गुरुजी, प्राचार्य डॉ.महेश देशमुख, व्यापारी संघटनेचे सुरेंद्र रेदासणी सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# युवकास मारहाण

प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील पाटील गल्ली भागात एका तरूणास मारहाण केली असल्याची तक्रार माजलगाव शहर पोलिसात दाखल झाली आहे.

या प्रकरणी माजलगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत सचिन बालासाहेब कुंभार यांनी म्हटले आहे की, आपणास बांधकाम बंद कर असे म्हणत गल्लीतीलच शिवलिंग कुंभार, बालाजी कुंभार या दोघांनी डोक्यात वीट मारून डोके फोडले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. सचिन कुंभार यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस राम भांडाणे हे करत आहेत.

# साडेतीन एकरवरील ऊस जळून खाक

## विद्युत तारेच्या स्पर्शाने ऊसाला लागली आग

प्रतिनिधी

माजलगाव : शहराजवळील फुलेपिंपळगाव शिवारातील गट क्र.२७१ मधील साडेतीन एकर उसाला दि. २ फेब्रुवारी रोजी विद्युत तारांच्या घर्षणाने आग लागली या लागलेल्या आगीत शेतकऱ्याचा जवळपास साडेतीन एकर ऊस जळून खाक झाला.

फुलेपिंपळगाव शिवारात हरिभाऊ नारायण सवणे, कमलबाई हरिभाऊ सवणे या दोघां शेतकऱ्यांच्या गट क्रमांक २७१ मध्ये एक हजार एक



जातीचा साडेतीन एकर ऊस असून शेतातून विद्युत प्रवाहाचे पोल गेलेले आहेत. मात्र, माहवितरणच्या दुर्लक्षामुळे त्याच्यावर तारा कायम लोंबकळत असल्याचे दिसून येते. यासंदर्भात परिसरातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी तक्रार करून देखिल त्याकडे महावितरणने दुर्लक्ष केल्यामुळे तारेला तारेचा स्पर्श होऊन ऊसाच्या फडात आग लागली. यात आगीत ऊस जळाला असून, शेतकऱ्याचे लाखों रूपयांचे नुकसान झाले आहे. घटनेचा पंचमाना करून नुकसान-भरपाई देण्याची मागणी केली जात आहे.

# सत्यासाठी लढा!

युवासंवाद

**निष्ठा राजपूत**

धाडसी मनाने प्रत्येक संकटांना सामोरे जायला, स्वाभिमान-अभिमानाने वर छाती करून जगायला, इमानदारीने पैसे कमवायला, आयुष्यातील प्रत्येक वेळ चांगल्या रीतीने गमवायला, यासाठी तर आलोय या जगी जगायला. जीवन हे अनमोल आहे जीवनाचे काही मोल नाही. करोडो वा अब्जो देवून आपणास जिवन विकत घेता येत नाही. जीवनात आलेली कोणतीही वेळ पुन्हा परत आणता येत नाही. त्यामुळे जिवनातील प्रत्येक वेळ चांगल्या रीतीने गमवा.आपण जिवन जगताना प्रत्येच गोष्टीत धाडस केलेच पाहिजे आणि सत्यासाठी लढायलाच पाहिजे. जीवनात जेवढे मिळाले आहे ना आपण तेवलढ्यात आनंदी राहायला पाहिजे. जीवनात या कशाची अति नको! उदाहरणार्थ आपणांस डोळे मिळाले आहे तर असे वाटते कि या डोळ्यावर छान दिसावे म्हनुन एक चष्मा पाहिजे पण विचार करा कि ज्याला डोळे नाही त्याचे काय हो! जे पुरेसे आहे ते भेटलयना मग कशाची अति. मला खुप राग येतो आत्महत्या करण्यांवर छे! राग एका दिवसाचे असू शकते, दोन दिवसाचे पण, पण पूर्ण जिवन का संपवायचं.आहो जगात शांत लोकांचे काहीच फायदा नाही त्यांचे प्रत्येक बाबतीत आहे ते मरणच .त्यामुळे लोकांना ना जागीच त्यांच्या शब्दांचे उलट वळण द्या लोकांचा विचार करण्याआधी हा विचार करा की आपल्यासाठी काय चांगले आहे मगच निश्चित करा कि काय करायचंय. आहो! लोकांचे तर काम आहे आपण केलेल्या निश्चयावर टीका करण्याचे. आज-काल लोकांना कमी श्रमात जास्त फळाची अपेक्षा असते. अरे! यश काही साधी-सुधी गोष्ट नाही लगेच हाती लागायला मेहनत करावी लागते खूप मनाच्या गाभारयातुन वाईट गोष्टींना हेकलावुन चांगल्या विचारांच्या कोठारया भरुन त्याला धिराचा कुलूप लावा लागतो. आहो! जर मी नाही याचे मीच असे शब्दरुपीच नाही तर जिवनाच्या प्रत्येक कार्यात अवलंब केला तर किती छान हो. जीवनात साथ देणारी माणसंही आहेत आणि दूर लोटणारी पण आहे वेळ आल्यावर हात पकडणारो पण आहे आणि हात सोडणारी पण, पण तुम्ही थांबु नका शुरासारखे जिवन जगा भाग्याची चिंता करू नका कारण Fortune Favoures the Braves शुरांना भाग्य साथ देते.

(लेखिका औरंगाबाद येथील ए.के.पाटील ज्युनियर कॉलेजची विद्यार्थीनी आहे.)



# स्वस्त धान्य दुकानांच्या चाव्या दलालांकडे!

## सामाजिक कार्यकर्ते राजरत्न खळगे यांचा खळबळजनक आरोप

प्रतिनिधी

माजलगाव : शहारातील काही स्वस्त धान्य दुकाने ही दलाला मार्फत चालवली जात आहेत.या दुकानदाराने गेले दोन महिन्यांपासून मोफतचा आलेल्या माल अजूनही दिलेला नाही. प्रत्येक मालामध्ये एक किलो कमी माल दिला जातो. याचा जाब विचारला तर माल आला नाही. माहीत नाही तहसिलला चौकशी करा, आम्हाला विचारणारे तुम्ही कोण ? असे उत्तर मिळतात. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी राजरत्न खळगे यांनी तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. दरम्यान, काही स्वस्त धान्य दुकानांच्या चाव्या दलालांकडे असल्याचा खळबळजनक आरोप निवेदनात राजरत्न खळगे यांनी केला.



शासन कोरोना काळ असल्याने गोरगरिबांना विविध योजनेत मोफत धान्य देत आहे. मात्र राशन वाटप करणारे दुकानदार हे शासनाच्या योजनेची वाट लावून टाकत असून आलेले धान्य हे दुसरीकडेच जात आहे. या बाबत अनेक वेळा तक्रारी, उपोषणे होवूनही या दुकानदारांना काही फरक पडत नसल्याने गोरगरिब लोक यांचा नाद सोडून देतात व या दुकानदाराचे फावते. व हा माल काळ्या बाजारात जातो. राज्य शासन गरीब व गरजू लोकांसाठी प्रति लाभधारकांस तीन किलो गहू व दोन किलो तांदूळ मोफत देते. मात्र येथील धान्य दुकानदारांनी दोन महिन्यांपासून मोफतचा माल दिलाच नाहीत. या प्रकाराची चौकशी करावी अन्यथा तहसिल कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राजरत्न खळगे यांनी दिला आहे. याप्रकरणी प्रशासनाने गंभीर दखल घेवून दलालांच्या मुसक्या आवळण्यासाठी मुळापर्यंत चौकशी करावी अशी मागणीही करण्यात आली आहे.

पान १ वरुन

**ऊसतोड महामंडळाच्या**

म्हणाल्या, ऊसतोड कामगारांसाठी विविध विभागांच्या माध्यमातून योजना राबविल्या जातात. ऊसतोड कामगार महामंडळाच्या योजनांना विधी व न्यायविभागाने नुकतीच मान्यता दिली आहे.या योजनांची माहिती ऊसकामगारांना होण्यासाठी स्थानिक प्रशासनाने जनजागृतीपर उपक्रम राबवावेत. आरोग्य तपासणी शिबीर, महिलांची तपासणी तसेच गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया (हिस्ट्रेक्टॉमी ) करण्यासंदर्भात बीड आरोग्य विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा.

सार्वजनिक आरोग्य विभागानेही याबाबतची माहिती पडताळून पहावी. परजिल्ह्यात जावून कोणी ऊस तोड महिला शस्त्रक्रिया करत असतील तर त्याचीही माहिती नजीकच्या जिल्ह्यांकडून घेण्यात यावी.ऊस तोड कामगारांचे प्रश्न सुटावेत यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या होत्या.सर्व विभागांनी केलेल्या सूचनांप्रमाणे त्यामध्ये नव्या बाबींचाही समावेश करण्यात येईल.सामाजिक संस्थांनीही ऊस तोड कामगारांसाठीचे कामामध्ये अशाच प्रकारे सातत्य ठेवावे. अशा सूचना या बैठकीत उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे यांनी दिल्या. तसेच ऊसतोड कामगारांसोबत महिला व बालविकास विभागाने बीड येथे बैठक आयोजित करावी. १५ फेब्रुवारी रोजी साखर आयुक्त व सहकार आयुक्त यांनी ऊस कारखान्यांच्या संचालकांना सहभागी करून ऊस तोड कामगांराबाबत कोणते निर्णय घेता येतील याबाबत सविस्तर माहिती सादर करावी. सामाजिक न्याय विभागाने ऊस तोड कामगारांची नोंद प्राधान्याने करावी जेणेकरून राज्यातील ऊस तोड कामगारांची माहिती उपलब्ध होईल. अशा सूचना या बैठकीत उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे यांनी दिल्या.

समाज कल्याण आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे म्हणाले, राज्यातील उसतोड

पान १ वरुन

कामगारांसाठी विविध कल्याणकारी व आर्थिक सुधारणांचा लाभ देण्याकरीता गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.या महामंडळासाठी साडे तीन कोटी रूपये मंजूर झाले आहेत. या महामंडळाचे पुणे येरवडा येथे मुख्य कार्यालय होणार असून परळी येथे क्षेत्रीय कार्यालय सुरू होणार आहे.

ऊसतोड कामगांच्या मुला मुलींसाठी राज्यातील ऊसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या तालुक्यांच्या ठिकाणी स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवान बाबा शासकीय वसतिगृह योजना राबविण्यात येते.सध्या मुलांची दहा व मुलींची दहा अशी २० वसतीगृह सुरू करण्यात आली आहेत. ऊसतोड कामगारांची नोंदणीची कार्यवाही लवकरच पूर्ण करणार आहे. ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण कार्यवाही सुरू आहे अशी माहिती डॉ.नारनवरे यांनी बैठकीत दिली.

### स्वरसम्राज्ञीस

तुम्ही सप्तसूरांच्या इंद्रधनू
न्हातसे अमृती सुरेल घनू ...!

नाथ कृपेची लाभे सावली
व्रतस्थ सेवा विश्वास भावली
सरस्वती स्वतःस लतालागली म्हणू...।।

नव्या जगाची नवीच आशा
ह्मदय फुलविते सोनल, 'उषा
आनंद घन वाजे रूणूझुणू ...

कैक वेलींनी शिकले बहरणे
मोहक फुलांनी शिकले गाणे
गंधर्व ते लागले गुणगुणू ...

स्वरतेजाने लख्ख माती
रत्नातले हे रत्न भारती
समेवर लोपवी सिमाच जणू...
आज सूर जनात्मवासी झाला....

: कवी प्रभाकर साळेगावकर

# लता मंगेशकर नावाचे स्वर विद्यापीठ

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी जेव्हा लतादीदींच्या आवाजातील 'ए मेरे वतन के लोगों, जरा आँखों में भर लों पानी!' हे गाणे ऐकले, तेव्हा त्यांचे डोळे पाण्यांनी डबडबले होते. ज्यांचा शासनाने महाराष्ट्र भूषण व भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव केला आहे, अशा जादुई आवाजाच्या धनी गानसम्राज्ञी लताजींच्या पावन चरणी 'अलककार- श्रीकृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखरुपातील श्रद्धासुमने अर्पण करीत आहोत...

लता मंगेशकर भारतातील एक पार्श्वगायिका गायिका होत्या. त्या सर्वोत्कृष्ट भारतीय गायिकांपैकी एक होत्या. तसेच त्यांना 'भारतीय गानकोकिळा' म्हणतात. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना 'लता दीदी' म्हणून ओळखले जाते. लतादीदींच्या कारकीर्दीची सुरूवात इ.स.१९४२मध्ये झाली. ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून होती. त्यांनी ९८०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली. तर २०हून अधिक प्रादेशिक भारतीय भाषांमध्ये प्रामुख्याने मराठी गायन केले आहे. त्यांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे होत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्यसंगीताचे प्रसिद्ध गायक होते.



लतादीदी मंगेशकरांचा जन्म मध्यप्रदेश-ब्रिटिश काळात सेंट्रल इंडिया एजन्सीच्या इंदूर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदया होते. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य होते. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लतादीदींना संगीताचे धडे प्रथमतः आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार भूमिकेने कामाची सुरूवात केली. इ.स.१९४२मध्ये त्या अवघ्या १३ वर्षाच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने मृत्यू पावले. तेव्हा त्यांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक- मास्टर विनायक यांनी लतादीदींच्या परिवाराची काळजी वाहिली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला.लतादीदींनी 'नाचू या गडे, खेळू सारे मनी हौस भारी' हे सदाशिवराव नेवरेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या 'किती हंसाल?' या मराठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातून वगळले गेले. मास्टर विनायकांनी त्यांना नवयुगच्या पहिली मंगळागौर या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. या चित्रपटात त्यांनी 'नटली चैत्राची नवलाई' हे दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेले गीत गायले.

इ.स.१९४५मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी-कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लतादीदी मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ- भेंडीबाजारवाले यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या 'आपकी सेवा में' या हिंदी चित्रपटासाठी 'पा लागूं कर जोरी' हे गाणे गायले. दत्ता डावजेकर हे त्या गाण्याचे संगीतकार होते. लतादीदी आणि आशादीदी यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात- 'बडी माँ'मध्ये नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. त्या चित्रपटात त्यांनी 'माता तेरे चरणों में' हे भजन गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लतादीदींची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली. इ.स.१९४७मध्ये भारताच्या फाळणीनंतर उस्ताद अमानत अलीखाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ-देवासवाले यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. उस्ताद बडे गुलामअली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही त्यांना तालीम मिळाली. इ.स.१९४८मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्यूनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नूरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई-अंबालेवाली, यांच्यासारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या. सुरूवातीला लतादीदी आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत. परंतु नंतर त्यांनी स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली बनवली. लतादीदी मंगेशकर यांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह ग्रंथाली प्रकाशनाने सन १९९५च्या आसपासच्या वर्षी प्रसिद्ध केला होता. त्याचे संपादन मधुवंती सप्रे यांनी केले होते. पुढे हे पुस्तक मिळणे कठीण झाले. तेव्हा जयश्री देसाई यांच्या पाठपुराव्यामुळे मैत्रेय प्रकाशनने 'फुले वेचिता' या नावाने ते पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. लतादीदींनी पहिली मंगळागौर या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. आवाजाला ईश्वरी देणगी लाभलेल्या लतादीदी मंगेशकर यांना श्वसनाचा त्रास, न्युमोनिया व कोरोनाची लागण झाल्याने त्या अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होत्या. अशातच लतादीदींनी दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात चिरनिद्रा घेतली. त्यांचे कुटुंबीय,मित्रमंडळी व चित्रपटसृष्टी शोकसागरात बुडाली. संपूर्ण भारत देशावर शोककळा पसरली. त्यांच्या जाण्याने जनता हुंदके देऊन रडत आहे.

**आदरांजली**

**कृष्णकुमार निकोडे**

# लतादीदींची भेट अविस्मरणीय : पंडित उद्धवबापू आपेगावकर

▶ प्रतिनिधी

अंबाजोगाई : भारतरत्न लता मंगेशकर यांच्या समवेत झालेली भेट अविस्मरणीय आहे, अशी प्रतिक्रिया जागतिक पातळीवरचे पखावाज वादक पंडित उद्धवबापू आपेगावकर यांनी 'वर्तमान'शी बोलताना सांगितली. लतादीदींच्या निधनानंतर संपूर्ण देशभर शोक व्यक्त केला जात आहे. पंडीत उद्धवबापू आपेगावकर यांनीही आपली आदरांजली व्यक्त केली.

पंडित उद्धवबापू आपेगावकर आपल्या आठवणींना उजाळा देत पुढे म्हणाले, तीस वर्षापूर्वीचा प्रसंग आठवला. दिवंगत पद्मश्री शंकरबापू आपेगावकर, विश्वनाथराव कराड, राहुल कराड, यांच्यासोबतीने मला त्यावेळी मुंबईत लतादीदींच्या दर्शनाचा योग आला. बापूजी, आपण मंदिरात बसुया म्हणत दीदी बोलत्या झाल्या. छोटंसं पण मनमोहक मंदिरात मंगेशाची मूर्ती विराजमान होती. आम्ही सर्वांनी दर्शन घेतले. दीदींनी स्वतः बापूंना शाल व मंगेशाची छोटी तसबीर भेट दिली. निघताना बापूंची नजर तेथेच ठेवलेल्या दोन तानपुयांवर गेली. जवळ गेले आणि त्यांनी या वाद्यांना नमस्कार केला. बापूजी, दररोज सकाळी एक तास तानपुरा छेडते, यावरच मी स्वरांचा रियाझ करते, दीदी उद्गारल्या. लतादीदींचे हे वाक्य शास्त्रीय, सुगम, नाट्य कलावंतांसाठी मार्गदर्शक आहे. लतादीदींच्या चरणी नतमस्तक होतो, असे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पखावज वादक पंडित उद्धवराव आपेगावकर यांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला. दरम्यान, लतादीदी या अतिशय नम्र होत्या, त्यांचा नम्रपणा त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतो, असेही आपेगावकर म्हणाले.



# प्रकाशदादा, जयसिंहभैय्यांमुळे मतदारसंघाचे नंदनवन होणार

## युवा नेते भागवत दराडे यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी



तेलगाव : माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके, बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंह सोळंके यांच्या प्रयत्नाने देवठाणा येथे दहा विहिरींना मंजुरी मिळाली आहे. यामुळे ग्रामस्थांनी सोळंके यांचे आभार व्यक्त केले. तर आमदार प्रकाश सोळंके, सभापती जयसिंह सोळंके हे मतदारसंघाच्या चौफेर विकासासाठी अहोरात्र परिश्रम घेत असून, त्यांच्या प्रयत्नाने मतदारसंघाचे निश्चितच नंदनवन होणार यात शंकाच नसल्याची, प्रतिक्रिया युवा नेते भागवत दराडे यांनी व्यक्त केली.



धारूर तालुक्यात शासकीय योजनेतुन नागरिकांना विहिरींची मंजुरी मिळाली. यात देवठाणा गावातील नागरिकांनाही विहिरींचा लाभ मिळावा म्हणून देवठाणा येथील दत्ता पाटील यांच्यासह सतिशपापा सोळंके, रविशंकर सोळंके, सरपंच मोरे, वैष्णव, ग्रामसेवक डांगे आदिंनी आमदार प्रकाश सोळंके व जि.प.सभापती जयसिंह सोळंके यांच्याकडे मागणी करून प्रयत्न केला होता. यासाठी वारंवार पाठपुरावा ही केला होता. ग्रामस्थांच्या या मागणीची आमदार प्रकाश सोळंके, सभापती जयसिंह सोळंके यांनी दखल घेत देवठाणा येथील तब्बल दहा नागरिकांना विहिरींची मंजुरी दिली. त्यामुळे या सर्वासह ग्रामस्थांनी सोळंके यांचे आभार व्यक्त केले. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके व जि.प.सभापती जयसिंह सोळंके हे चुलते-पुतणे मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासासाठी अहोरात्र परिश्रम घेत असून, मतदारसंघ सुजलाम सुफलाम करून, नंदनवन करण्यासाठी त्यांचे कायम प्रयत्न असतात. त्याचे ताजे उदाहरण म्हणजे धारूर तालुक्यात बहुतांश शेतकऱ्यांना विहिरींचा लाभ मिळवुन दिला असून, यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी ओलिताखाली येणार आहेत. आमदार प्रकाश सोळंके व सभापती जयसिंह सोळंके यांच्या अशा प्रयत्नाने बारामतीच्या धरतीवर मतदारसंघाचा विकास तसे नंदनवन होणार यात शंकाच नसल्याची, प्रतिक्रियाही राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस भागवत दराडे यांनी दिली आहे.



# शेतकऱ्यांचा पीकविमा तात्काळ बँक खात्यात वर्ग करा

## राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष जाधव यांची मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पीकविमा इशुरन्स कंपन्यांनी तात्काळ त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजलगाव तालुकाध्यक्ष नितीन जाधव यांनी केली आहे. दरम्यान, या मागणीचे निवेदन सोमवारी आमदार प्रकाश सोळंके यांना दिले आहे.

बीड जिल्ह्यातील शेतकरी हा गारपीट, अतिवृष्टीमुळे तसेच कोविडच्या महामारीमुळे आर्थिक विवंचनेत सापडलेला आहे. त्यास भर इन्शुरन्स कंपनीच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांचा पीक विमा थकलेला आहे.

दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ वर्ग व्हावा यासाठी संबंधीत विमा कंपनीस तात्काळ निर्देश देण्यात येवुन बीड जिल्ह्यातील समस्त शेतकऱ्यांची समस्या सोडवावी असे मागणी चे निवेदन देण्यात आले. सदरील मागणीचे निवेदन देताना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजलगाव तालुकाध्यक्ष नितीन जाधव, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष क्षितीज गायकवाड, शेतकरी उपस्थित होते.




## 'वर्तमान'ने सकारात्मक पत्रकारिता रूजविली : चंद्रकांत शेजुळ



माजलगाव : 'आधुनिक विचारांचे वर्तमान' या वृत्तपत्राने सामाजिक जाणिवा जपत माजलगाव मतदारसंघ आणि जिल्ह्यात सकारात्मक पत्रकारिता रूजविली, असे गौरवोद्गार तुळजाभवानी अर्बनचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत शेजुळ यांनी गुरूवारी माजलगाव येथे काढले. वर्तमान माध्यम समुहाने प्रसिद्ध केलेल्या अभिष्टचिंतन अंकाचे चंद्रकांत शेजुळ यांनी प्रकाशन करून वर्तमान टीमचे कौतुक केले.

# पृथ्वीराज निर्मळ यांची कार्याध्यक्षपदी निवड

▶ प्रतिनिधी

माजलगाव : पुरोगामी पत्रकार संघाची राज्यस्तरीय निवड व बैठक बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे दि.३० जानेवारी २०२२ रोजी दुपारी १ वाजता महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, प्रदेशाध्यक्ष विजयकुमार वाव्हळ, राष्ट्रीय महासचिव विनोद पवार प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक दशरथ रोडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाली. या बैठकीमध्ये सर्वानुमते पत्रकार पृथ्वीराज निर्मळ यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.







आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.